ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 6 | July - 2016

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) [Yr. 2016]

ISRJ Indian Streams Research Journal

# साठोत्तरी मराठी कादंबरी : एक परामर्श

**प्रा. डॉ. भास्कर निफाडे**
सहयोगी प्राध्यापक, पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्र,रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय,
श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

## प्रस्तावना

कादंबरी हा मानवी जीवनप्रवाहाबरोबर चालत आलेला, वाढत असलेला व सतत बदलत असलेला लवचिक वाङ्मय प्रकार आहे. इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणेच या वाङ्मयप्रकाराची स्वतःची अशी एक बदलत आलेली संकेतव्यवस्था आहे. ही संकेतव्यवस्था घटना, कथानक, पात्रे, निवेदक, निवेदनशैली, भाषा, वातावरण, लेखकाचा दृष्टिकोण प्रस्तुती करणाच्या




पध्दती आदी विविध अंगांनी मिळून बनलेली आहे. सर्व घटक एकत्र मिळूनच कादंबरीची संरचना उभी राहते आणि असे म्हटले जाते की, “कोणत्याही वाङ्मय प्रकाराचे निराळेपण त्याच्या या अवस्थेत असते.”[१] याला कादंबरीसारखा बहुभाषिक, बहुचर्चित लोकप्रिय वाङ्मयप्रकारही अपवाद नाही. म्हणूनच कादंबरीच्या या संकेत व्यवस्थेचा नेटकेपणाने अभ्यास केला की या वाङ्मयप्रकाराचे नेमके आकलन होऊ शकेल तसेच कालमानानुसार कादंबरीच्या विविध घटकात झालेला बदल, कथानक, पात्रचित्रण प्रस्तुतिकरणाच्या पध्दती, भाषा इत्यादी घटकांच्या तंत्रात्मक बदलामुळे कादंबरीच्या संरचनेत झालेला बदल, अनुभवाच्या जातीनुसार कादंबरीचे होणारे उपप्रकार कादंबरीच्या वाटचालीत झालेला बदल नव कादंबरीचा उदय व तिचे स्वरूप इत्यादी अनेक गोष्टीही कळतील. थोडक्यात कादंबरीची जडण घडण, कादंबरीची स्थित्यंतरे व कृत्यंतरे यांचे आकलन व्हायला मदत होईल.

कादंबरीसारख्या गद्य वाङ्मय प्रकाराचा काही एका कालखंडाचा इतिहास तपासताना या व्यवस्थेतील भाषिक, मानसिक आणि तात्विक विचार लेखक वाचकाच्या घडणीत सक्रीय असतात त्याचाही विचार करावा लागतो. यातून हाती आलेल्या आकाराचा आणि प्रकाराचा शोध घेणे पात्रांना आणि घटनांना वेगळे काढून त्यांची चिकित्सा करणे या इतिहासातून संस्कृतीवर प्रकाश टाकणाऱ्या काही संकल्पना हाती लागतात का हे ही पाहवे लागते. या सर्वांचा विचार केला तर लक्षात येते की, १९६० ते २००० या कालखंडातील कादंबरी नायक, नायिका, शैली अशा पध्दतीने रचल्या जाणाऱ्या पारंपारिक कादंबरीपेक्षा ही कादंबरी वेगळी होऊ लागली. जीवनाबद्दलचे वाढते कुतूहल तिच्यात निर्माण झाले. एखाद्या विषयावर कादंबरी लिहिण्यापेक्षा प्रत्यक्ष जीवनानुभवाचाच कलात्मक आविष्कार करण्याकडे तिचा कल वाढू लागला. माणसाचे स्वतःशी, इतरांशी आणि निसर्गाशी आलेले संबंध अधिक नेटकेपणाने येऊ लागले. जीवनातील गुंतागुंतीची व्यामिश्रतेची जाणीव अधिक तीव्र झाल्याचे दिसते. वासना विकार, विध्वंस, राग, लोभ, प्रेम, द्वेष इत्यादीकडे हे लेखक अधिक

धिटाईने बघतात व जीवनावर होणाऱ्या बऱ्यावाईट परिणामांची दखल तितक्याच तीव्रतेने कादंबऱ्यातून आविष्कृत करतात. माणूस आणि बरेवाईट मानवी व्यवहार याबद्दलची लौकिक आणि मानूष जिज्ञासा ते व्यक्त करतात. लेखक आणि वाचक यांच्यातल्या संबंधाला साठपूर्व कादंबरीत फार महत्त्व होते. एकोणीसशे साठनंतर मात्र लेखक आणि त्याचा अनुभव यांचा संबंध महत्त्वाचा मानला जावून निर्मिती प्रक्रियेत इतिहास, चरित्र यांचेही मिश्रण होऊ लागले. एकाच वेळी ही कादंबरी वर्तमानाला सामोरी जाणारी आणि त्याच बरोबर विरोधी अशा भूतकाळाकडेही झेपावताना दिसते. एका बाजूला मानवी मनाची गहनगुढता लक्षात घेत असतानाच दुसऱ्या बाजूने वर्गसंघर्षाचे भान आणि सामाजिक प्रतिबध्दता यांचीही दखल घेऊ लागली. आजवरची पांढरपेशी अभिरूची विस्तारू लागली आणि ग्रामीण व नागर अभिरूचीची समस्या निर्माण झाली. अनेक थरातल्या नागरिकांना सामावून घेणाऱ्या विशाल समाजाचे स्वरूप तिला प्राप्त झाले. शिष्ट संकेताची ती फारशी फिकीर करताना दिसत नाही. 'स्व'चे नवे भान तीला आले व अनुभवाची अनेक क्षेत्रे तिने धुंडाळली. स्वातंत्र्योत्तर काळात रझाकारी जुलमाखाली होरपळून निघालेल्या मराठवाडा, खानदेशचा सीमाभाग बुध्दिवाद आणि धर्मश्रध्दा या द्वंद्वात सापडलेली मने ड्रायव्हर, क्लिनर, जोगती, जोगतिनी, विडीकामगार, शेतमजूर, भटक्या जमाती, दलित जीवन, स्त्रीजीवन, राजकीय जीवन अशा अनेक अंगांनी मराठी कादंबरी विकसित झाली. या कालखंडातील मराठी कादंबरीच्या ग्रामीण, प्रादेशिक कादंबरी, दलित कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, पौराणिक कादंबरी, राजकीय, महानगरीय कादंबरी इत्यादी अनेक दिशा स्पष्ट होतात.

### ग्रामीण (प्रादेशिक) कादंबरी :-

१९६० नंतर ग्रामीण कादंबरीचा प्रवाह सशक्त होत गेलेला दिसतो. मनोहर तल्हार, शंकर पाटील, रा. रं. बोराडे, आनंद यादव, माडगुळकर, महानोर, हमीद दलवाई यांच्या कादंबऱ्या पुढे आल्या. त्या आधी ग. ल. ठोकळ, म. भा. भोसले, श्री. ना. पेंडसे, र. वा. दिघे, गो. नी. दांडेकर, अण्णाभाऊ साठे, उध्दव शेळके या लेखकांना ग्रामीण कादंबरी क्षेत्रात महत्त्वाचे स्थान आहे. १९६० नंतरच्या काळात भारतीय जीवनात अनेकविध बदल अनेक पातळ्यावर घडू लागले. या बदलाचे वास्तव चित्रण ग्रामीण कादंबरीने केले. शंकर पाटील यांची टारफुला ही या संदर्भात महत्त्वाची कादंबरी मानली जाते. १९८० नंतर ग्रामीण जीवनातील धर्मसंस्थांमुळे होणाऱ्या शोषणाचे चित्रण कादंबरीत येऊ लागले. राजन गवस यांची 'चौंडक' भंडारभोग, तणकट, उत्तम बंडू तुपे यांची 'झुलवा', अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी', नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' या अलिकडच्या कादंबऱ्यातून दलित बहुजन समाजाच्या संघर्षावर प्रकाश टाकलेला दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर काळातील नियोजन विकासासाठी समाजातील दुर्बल घटकाला कसली जबर किंमत मोजावी लागते याचे प्रभावी चित्रण विश्वास पाटील यांच्या झाडाझडतीत येते. मोहन पाटील, बा. ग. केसकर, रा. रं. बोराडे, सदानंद देशमुख, बाबाराव मुसळे, महादेव मोरे, आनंद पाटील यांनी खेड्यातल्या अवस्थेचे आपल्या कादंबऱ्यातून उल्लेखनीय चित्रण केले आहे. या काळातील राजकारणाचे विदारक दर्शन रंगनाथ पठारे आणि राजन गवस यांच्या कादंबऱ्यातून घडते. ग्रामीण जीवनाची कक्षा आदिवासींच्या आयुष्यापर्यंत पोहचली ती मधुकर वाकोडे यांच्या झेलझपाट व सिलिपसेरा या कादंबऱ्यांमुळे. ग्रामीण कादंबरीचा प्रवाह या काळात जोमदारपणे विकसित झालेला दिसतो.

### दलित कादंबरी :-

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्याचा एक दमदार व जोरदार प्रवाह निर्माण झाला. कादंबरीचा विचार करता दलित व दलितेतर अशा दोन्ही लेखकांनी दलितांच्या जीवनावर कादंबऱ्या लिहिल्या मात्र दलितेतर लेखकांना दलित जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव नसल्याने विविधांगी दलित जीवनाचा वेध त्यांना घेता आला नाही. अपवाद विभावरी शिरूरकर, मधु मंगेश कर्णिक व राजन गवस यांचा करावा लागेल.

अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, केशव मेश्राम, माधव कोंडविलकर, अशोक व्हटकर, नामदेव ढसाळ, ना. म. शिंदे, भीमसेन देठे, नामदेव कांबळे यांनी दलित जीवनाचे वास्तवपुर्ण आणि विविधांगी चित्रण केले आहे. दलित कादंबरीचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तिला प्राप्त झालेले आंबेडकरांचे वैचारिक अधिष्ठान, आत्मविकासाची डोळस जाणीव आंबेडकरांनी दलितांना दिली. त्यामुळे दलित कादंबऱ्यातून आंबेडकरी विचार प्रकट झालेला आहे. दलित कादंबरीची भाषा आशयाशी एकरूप झालेली दिसते. दलित कादंबरीने भाषेबद्दलच्या रूढ समजुतींना उध्वस्त केले ही भाषा जाती जमातीच्या वैशिष्ट्यांनी भरगच्च आहे.

### राजकीय कादंबरी :-

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात लोकशाही राज्य व्यवस्था आल्यामुळे राजकारणाचा अर्थ अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. आजच्या काळात अर्थकारण, समाजकारण व राजकारण ही अंगे एकमेकांत इतकी मिसळून गेली आहे की त्याचा संबंध कोणत्या ना कोणत्या प्रकारे सत्तासंपादनाशी जोडला जातो. या संधीचा मराठी लेखकांनी कसा उपयोग करून घेतला हे पाहताना दोन गोष्टी जाणवतात. एक म्हणजे स्वातंत्र्यलढ्यातील व्यक्तींना नायक कल्पून लिहिलेल्या कादंबऱ्या टिळक, गांधी, सावरकर, सुभाषचंद्र बोस अशा

अनेक व्यक्तींच्या निमित्ताने केलेले कादंबरी लेखन. या कादंबऱ्यात नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रकटन असते. त्या अनुषंगाने घटना, प्रसंग येत असतात, तर बदललेल्या राजकीय परिस्थितीचे आशयसूत्र असणारी कादंबरी म्हणजे वसंत वरखेडकर यांची प्रतिनिधी. राजकीय परिस्थितीच्या बदलाचे व त्यामागील आंदोलनाचे चित्रण करणारी दुसरी महत्त्वाची कादंबरी म्हणजे ग. प्र. प्रधानांची 'साता उत्तराची कहाणी', राजकीय परिस्थितीचा व्यापक पट उभी करणारी रंगनाथ पटारेंची 'ताम्रपट' ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण ठरते. अरूण साधू यांची 'मुंबई दिनांक, सिंहासन, तडजोड' या कादंबऱ्यातून वृत्तपत्रीय जगत, राजकीय तडजोडी, राजकीय नेत्यांची घुसमट याचे प्रत्ययकारी चित्रण घडवले आहे. पण ते वृत्तपत्रीय निवेदनाचे संस्कार घेऊन येते. थोडक्यात एकूण राजकीय परिस्थितीचे चित्रण करणाऱ्या साठोत्तरी काळातील कादंबऱ्यात आशय प्रकट करण्यात विविधता आली आहे. हे प्रयत्न कमी असले तरी आश्वासक आहेत.

### स्त्री लेखिकांची कादंबरी :-

शिक्षणामुळे आणि सुधारणावादी मतामुळे आपल्या अनुभवांना शब्दबध्द करण्याचा विश्वास स्त्रीयांमध्ये निर्माण झालेला होता. याचे प्रत्यंतर स्त्रीयांच्या कादंबरी लेखनात येते. १९५० साली विभावरी शिरूरकरांची बळी प्रसिध्द झाली व तिने वास्तवाचे नवे पर्व सुरू केले. त्यांनी आपल्या काळाची नस अचूक पकडली. या काळात कमल देसाई या प्रगल्भ लेखिकेने एक निराळी वाट शोधली. रात्रंदिन आम्हा, काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई या कादंबऱ्या व्यामिश्र अनुभव, संज्ञाप्रवाही शैली व नेणिवेची धुसरता यामुळे असांकेतिक वाटतात. १९७५ नंतर स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती यावर चर्चा होऊ लागली. ज्योत्स्ना देवधर, निर्मला देशपांडे यांच्या कादंबऱ्यांनी एक वेगळे स्थान निर्माण केले. कुळाचार व गृहजीवनाचे तपशील त्यांच्या कादंबऱ्यात कटाक्षाने असतात. अंबिका सरकार, आशा बगे, शांता गोखले, गौरी देशपांडे, सानिया यांनी अनुभवाच्या अनेक क्षेत्राला गवसणी घालणारे लेखन केले. मैत्री या मूल्यभावाचे दर्शन गौरी देशपांडे यांच्या प्रत्येक कादंबरीत दिसते. थोडक्यात आधुनिक जीवन पध्दतीने उत्पन्न केलेले पेच मांडण्याचा प्रयत्न साठोत्तरी स्त्रीलेखिकांच्या कादंबऱ्यातून झालेला दिसतो.

### ऐतिहासिक कादंबरी :-

१९५९ साली प्रकाशित झालेल्या 'सत्तावनचा सेनानी' या वरखेडकरांच्या कादंबरीपासून नव्या काळातील ऐतिहासिक कादंबरी सुरू होते. पण खरे यश लाभले ते रणजित देसाईंच्या 'स्वामी' या कादंबरीला. स्वामीनंतर ना. स. इनामदारांच्या 'झेप, झुंज, राऊ, मंत्रावेगळा', गो. नी. दांडेकरांच्या कादंबरीतील शिवकाळातील 'बया दार उघड, हरहर महादेव, माचिवरला बुधा, दर्याभवानी' या कादंबऱ्या याच काळात आल्या. त्यानंतर विश्वास पाटील यांची 'पानिपत' या सर्व कादंबऱ्यांतून शिवकाल व पेशवेकाल साहित्यात अवतरला आणि मराठी साहित्यावर प्रभुत्व गाजवणारी रोमॅन्टिक वृत्ती पुन्हा नव्याने उजळली गेली.

### पौराणिक कादंबरी :-

ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच पौराणिक व्यक्तिमत्त्वासंबंधी समाज मनात राग, लोभ, अनुकूल, प्रतिकुल प्रतिक्रिया निर्माण झालेल्या असतात. परंपरेने त्या दृढही झालेल्या असतात. तेव्हा त्यांच्या पलिकडे जाऊन ललित कलाकृती निर्माण करणे परंपरेच्या दडपणाखाली वावरणाऱ्या समाजात संभवनीय असले तरी अत्यंत अवघडही असते. पौराणिक व्यक्तिरेखांवर लिहिणाऱ्या अनेक कादंबरीकारांना म्हणूनच मोठ्या मर्यादा पडलेल्या जाणवतात. ययाती, मृत्यूंजय, वैदेही, राधेय, मुंगी उडाली आकाशी, कर्णायन, महापुरूष या आणि अशा कादंबऱ्यांचा विचार या दृष्टिने करता येईल. दि. बा. मोकाशी यांची 'आनंद ओवरी' ही कादंबरी मात्र पौराणिक कादंबऱ्यांच्या प्रवाहातली एक वेगळी आणि अर्थपूर्ण निर्मिती म्हणता येईल. लौकिक आणि अलौकिक जीवनातले भावसंबंध येथे समर्थपणे मांडले आहेत.

### चरित्रात्मक कादंबरी :-

पौराणिक आणि ऐतिहासिक विषयांप्रमाणेच चरित्रात्मक कादंबऱ्यातून आलेला काळ तसा अलिकडचा आहे. त्यामुळे त्यातून वापरण्यात आलेल्या घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा, सामाजिक परिस्थिती, वातावरण तसे अधिक परिचयाचे आहे. चरित्र नायकाच्या यशापयशात लेखकाला रस तर असतोच पण त्याचबरोबर त्यामागे कार्य करणाऱ्या कार्यकारणभावामध्येही तटस्थ सह्यतेने रस घेतात आणि त्या अनुरोधाने अनुभवाचे कलात्मक संघटनही करतो.

आनंदी गोपाळ, साहेब, दुर्दम्य, आनंदवनभुवन, उत्तरयोगी, जीवनस्वप्न, पुत्र मानवाचा, युगप्रवर्तक अशा काही चरित्रात्मक कादंबऱ्या या कालखंडात आल्या. पण यातून चरित्र नायकाच्या जीवनाचे आकलन करण्यापेक्षा त्याच्या जीवनातल्या मोजक्या आणि मोक्याच्या जागा भरण्यापेक्षा व त्याचे मानवीपण चित्रित करण्यापेक्षा नायकाची उदात्त प्रतिमा उभी करण्याच्या नादात त्या फासलेल्या दिसतात.

### विज्ञान कादंबरी :-

मराठीत १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात विज्ञान साहित्याचा जन्म झाला. वा. म. जोशी यांची 'अदृश्य किरणांचा दृश्य प्रकाश', श्री. बा. रानडे यांची 'तारेंचे हास्य' व नाथ माधवांची 'श्रीनिवासराव' ही विज्ञानधिष्ठित कादंबरी याच काळातली. १९५५ नंतर मराठीत विज्ञान साहित्याने रूप धरल्याचे दिसते. १९६५ नंतरच्या काळात जयंत नारळीकरांच्या रूपाने विज्ञान साहित्याला एक चांगला लेखक मिळाला. विज्ञान कथांच्या तुलनेत विज्ञान कादंबऱ्यांची निर्मिती मात्र अत्यल्प आहे. गो. वा. सरदेसाई यांची 'त्रिपुरारी', राजेंद्र बर्वे यांची 'स्कायलॅब', निरंजन घाट्यांची 'वारस, युगंधर', जयंत नारळीकरांच्या 'प्रेषित, वामन परतुनी न आला', शुभदा गोगटे यांची 'यंत्रायणी', लक्ष्मण लोंढे यांची 'देवासी जीवे मारिले', अरूण साधू यांची 'विप्लवा, स्फोट' या काही ठळक विज्ञान कादंबऱ्या. नवनवे लेखक या साहित्य प्रवाहाकडे आकर्षित होत आहेत. विज्ञानाने निर्माण केलेली नवनवी आव्हाने व खुले केलेले अवकाश कवेत घेण्याचा प्रयत्न नवोदीत लेखक करीत आहेत ही जमेची बाजू आहे.

### सारांश :-

१९६० ते २००० या कालखंडातील मराठी कादंबरीचा आढावा घेतला असता असे दिसते की, मराठी कादंबरीच्या जडणघडणीत आणि विकासात शिक्षण प्रसाराचा आणि त्या त्या काळातील वाङ्मयाभिरूचीचा परिणामही दिसून येतो. कादंबरी संख्येने वाढली तसा तिच्या वाटचालीत आत्मविश्वासही वाढलेला दिसतो. ती समाज वास्तवाच्या अधिक जवळ गेली. विविध विचारप्रणाली तिने स्वीकारल्या, सामाजिक, राजकीय, औद्योगिक बदलांचे भान तिने राखले. अनेक प्रवाह आपल्यात सामावून घेतले विविध पातळ्यावरील, जीवनाच्या ठेवणीमागील, दु:खामागील कारणांचा ती वेध घेऊ लागली, परिणामी तिला अधिक समाजसापेक्ष, सर्वस्पर्शी व अर्थपुर्ण रूप प्राप्त होऊ लागले. त्याचबरोबर दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, नागर, महानगरीय, वैज्ञानिक जाणिवांचा भांडवलदारी व मुक्त अर्थव्यवस्थेचा संदर्भही आता या कादंबरीला महत्त्वाचा वाटू लागला आहे. त्यामुळे जीवनाच्या सर्वांगांना स्पर्श करीत मराठी कादंबरी एका वेगळ्याच सामर्थ्याने अवतरत असलेली दिसते.

### संदर्भ ग्रंथ :-

१. कादंबरी - ल. ग. जोग.
२. मराठी कादंबरी : पहिले शतक - कुसुमावती देशपांडे.
३. मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप - हातकणंगलेकर / पवार.
४. मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा - चंद्रकांत बांदिवडेकर.
५. कादंबरी : एक वाङ्मय प्रकार - जान्हवी संत.
६. मराठीतील प्रायोगिक कादंबरी आणि शाम मनोहर - किशोर सानप.
७. प्रदक्षिणा (दुसरा खंड) - अविनाश सप्रे.